# निशाणी क्र. ५ वरील आदेश

## (पारित दि. २८.०२.२०२५)

वादीने हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ३९ व नियम १ व २ अंतर्गत प्रतिवादी क्र. १ यांनी स्वत: वादग्रस्त मिळकत इतर कोणासही विक्री, गहाण, दान, बक्षिस अथवा इतर मार्गाने हस्तांतरीत करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, मौजे उमरी, तालुका केज जिल्हा बीड येथील सर्वे नंबर ५५/१० मधील क्षेत्रफळ ००.२९ हे.आर, आकार ० रु. ४७ पै., पैकी वादग्रस्त जमीन ०० हे. २९ आर असून त्यास यापुढे **'वादग्रस्त मिळकत'** म्हणून संबोधण्यात येईल.

३. पुढे वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ हा वादी क्र. १ चा वडील असून वादी क्र. २ चा पती आहे. वादी क्र. १ ही तिचे जन्मापासून मौजे कानडी माळी, ता. केज येथेच राहते. तसेच वादी क्र. २ तिचे लग्नापासून प्रतिवादी क्र. १ सह कानडी माळी येथेच राहत असून त्यांची मौजे उमरी शिवारात जमीन व ग्रामपंचायत हद्दीत जुने पडके घर आहे. वादग्रस्त मिळकत ही वादी प्रतिवादीची वडीलोपार्जीत व एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. वादग्रस्त मिळकतीशिवाय प्रतिवादी क्र. १ यास त्याचे वडीलाकडुन आणखी सर्वे नं. ५५/३ मध्ये २ एकर जमीन वाटुन आलेली होती. सदर जमीन त्यास कौटुंबिक कायदेशीर गरज नसतानाही वाईट व्यसनामुळे वादी क्र. २ हिची कोणतीही संमती न घेता मौजे उमरी येथील आप्पा दगडु मुळे यास सन १९७९ साली विक्री केली आहे. सदर जमीन विक्रीतुन आलेल्या रकमेची प्रतिवादी क्र. १ ने आपल्या कुटूंबासाठी एकही रुपया खर्च केलेला नाही. त्यानंतर सदर जमीन आप्पा मुळे यांनी मौजे उमरी येथील बाबासाहेब निवृत्ती भैरट यांना सन १९९३ साली विक्री केलेली आहे. त्यामुळे सात बारा उता–यावर प्रतिवादी क्र. १ चे नाव फक्त वादग्रस्त मिळकतीस कुटूंब कर्ता म्हणून मालकीहक्कात नोंद झालेली आहे.

४. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर प्रतिवादी क्र. १ हा वादी क्र.

१ व २ यांचेबरोबर कानडी माळी येथे राहिला व नंतर कोणाशीही कल्पना न देता पुणे येथे ३–४ वर्षे राहिला. दरम्यानचे काळात प्रतिवादी क्र. १ चे प्रतिवादी क्र. २ चे आईसोबत अनैतिक संबंध सुरु झाले व त्यातुन त्यांना प्रतिवादी क्र. २ हा झाला. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यास वादग्रस्त मिळकतीमध्ये कोणताही कायदेशीर हक्क नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ हे वादग्रस्त मिळकतीवर एकत्रीवर काबीज राहुन एकत्रीतरित्या उपभोग घेत आहेत. वादग्रस्त मिळकतीच्या अद्याप वाटण्या झालेल्या नाहीत त्यामुळे वादी क्र. १ व २ यांचा त्यामध्ये अविभाज्य असा कायदेशीर २/३ हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ हा पुर्वीपासून वाईट व्यसनाचे आहारी गेल्यामुळे तो कामधंदा करत नाही व गुपचूप वादग्रस्त मिळकत विक्री करण्याची धमकी देतो व तसा प्रयत्न करत आहे. त्यामुळे वादी यांनी वादग्रस्त मिळकतीमधील त्यांचा असणारा २/३ अविभाज्य हिस्सा वाटुन मागितला असता त्यास प्रतिवादी क्र. १ ने स्पष्ट नकार दिला. सात बारापत्रकी प्रतिवादी क्र. १ चे एकटयाचे नाव असल्याने त्याचा गैरफायदा घेवून वादग्रस्त मिळकत विक्री केली तर वादी यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. त्यामुळे सकृत दर्शनी केस ही वादीच्या बाजुने आहे. शेवटी वादीने मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्यामध्ये हजर होवुन त्यांचे म्हणणे तसेच लेखी कैफियत निशाणी क्रमांक १६ वर दिले आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दावा कलम १ मधील नातेसंबंधाबाबतचा मजकूर चुक व खोटा असून ते कानडी माळी येथे राहावयास गेले नाहीत व तेथील रहिवासी नाहीत असे कथन केले. दाव्याचे कलम १ मधील वादीने दिलेला नातेसबंधाबाबतचा मजकूर चुक, खोटा व बनावटी आहे. प्रतिवादी क.१ हे केंव्हाही कानडी माळी येथे राहावयास गेलेले नाहीत व तेथील रहिवाशीही नाहीत. वादींचा प्रतिवादी क.१ शी काहीही सबंध नव्हता व नाही. वादग्रस्त मिळकतीशी मुळात वादींचा काहीही हक्क संबंध नव्हता व नाही. तरी पण संबंध आहे असे गृहीत धरले तरी वादींनी दाव्यात आवश्यक असलेल्यांना पक्षकार केलेले नाही. तसेच वादींनी दाव्यात अर्धवट मालमत्ता वादमिळकत म्हणून घेतलेली असल्याने आवश्यक मिळकत सामील केली नसल्याची हरकत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा खर्चासह खारीज करणे योग्य व न्यायाचे आहे.

६. प्रतिवादी क.१ ने त्यांचे नावे असलेल्या सर्वे नं. ५५/३ मधील दोन एकर जमीन पूर्ण हिस्सा हा दिनांक २७/७/१९७९ रोजी सर्व कायदेशिर बाबींची पूर्तता करून कायम स्वरूपी विक्री केलेला आहे. सदर खरेदीखताआधारे आप्पा दगडू मुळे यांचे नांवे कायदेशिर फेरफार क्र.६१७ हा मंजूर झालेला आहे. आप्पा दगडू मुळे यांनी सदर मिळकत ही बाबासाहेव निवृत्ती भैरट यांना विक्री केलेली आहे. सदर मिळकतीमधून आलेली रक्कम ही प्रतिवादी क.१ ने त्यांच्या कुटुंबाच्या नैसर्गिक गरजा पुर्ण करण्यासाठी खर्च केलेली आहे. सदर रक्कमेशी किंवा मिळकतीशी वादींचा काहीही कायदेशिर हक्कसंबंध नसल्याने त्यांची संमती घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही किंवा त्यांना विचारण्याचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी क.१ चा विवाह गंधारबाई बन्सी कसबे यांच्याशी झालेला होता. तेंव्हापासुन तो पोटभरण्यासाठी पुणे येथेच राहत होता. पुणे येथे राहत असतानाच प्रतिवादी क.२ चा जन्म झालेला असुन प्रतिवादी क.१ हे कानडी माळी येथे कधीही राहण्यास गेलेला नव्हता व नाही. वादी क्र.१ ही प्रतिवादी क.१ पासुन झालेलीच नाही. कारण प्रतिवादी क्र.१ चा वादी क.२ शी केंव्हाही संबंध आलेला नाही. वादी हया काल्पनिक कथन घेवून कोर्टासमोर आलेल्या आहेत. वादींशी प्रतिवादी क.१ चा काहीही संबंध नव्हता व नाही. प्रतिवादी क.१ हे डिएनए टेस्ट करण्यास तयार आहेत. प्रतिवादी क.२ हे प्रतिवादी क. १ चा एकमेव वारस मुलगा असुन तो प्रतिवादी क.१ चा कायदेशिर वारस आहे. प्रतिवादी क.१ ची पत्नी गंधारबाई ही बऱ्याच वर्षापुर्वी मयत झाली. तेंव्हापासुन प्रतिवादी क.१ ने प्रतिवादी क्र. २ चा पुणे येथेच संभाळ केला व प्रतिवादी क.२ सज्ञान झाल्यानंतर प्रतिवादी क.१ हे उमरी येथे राहण्यास आलेला आहे. आजही तो गावातील लोकांचे मिळेल ते काम करून त्यांच्याकडून मोबदल्यात आपला कसाबसा उदरनिर्वाह भागवत आहे.

७. सदर मिळकत ही प्रतिवादींची वडीलोपार्जीत मिळकत आहे. वादी व प्रतिवादी क.१ हे केव्हाही एकत्र राहिलेले नाहीत व त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. त्यामुळे वादींचा वादग्रस्त मिळकतीवर काबीज असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वादींचा सदर मिळकतीशी व प्रतिवादींशी काहीही संबंध नसल्याने प्रतिवादीकडे वाटणी मागण्याचा कायदेशिर अधिकारही प्राप्त होत नाही. त्यामुळे वादीचा मनाईचा अर्ज खारीज करणे योग्य व न्यायाचे आहे. वादी हया उमरी येथे कधीही आलेल्या नाहीत किंवा त्यांचा उमरीला

येण्याचा कांहीही संबंध नव्हता व नाही. त्यामुळे प्रतिवादीने वादींना धमक्या देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वादी हया कानडी माळी येथेच राहतात त्यामुळे प्रतिवादीला संभाळण्याचा प्रश्नच येत नाही. प्रतिवादी क.१ च्या नांवे वादग्रस्त मिळकत आहे. पंरतु सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क.१ बरोबर त्याच्या बहिणी आसराबाई गंगाराम कोळी व अनुसयाबाई लिंबा हया कायदेशिर वारस आहेत आणी इतर हक्कामध्ये आजही त्यांचे नांवे कायम आहेत. ज्याचा फेरफार क्र.३१४ आजतागायत कायम आहे. प्रस्तुत प्रकरणात आसराबाई गंगाराम कोळी व अनुसयाबाई लिंबा यांना शरीक करणे आवश्यक असतांना त्यांना वगळून प्रस्तुतचे प्रकरण दाखल केलेले असल्याने प्रस्तुतचा मनाई हुकुमाचा अर्ज व दावा खर्चासह खारीज करणे योग्य व न्यायाचे आहे.

८. वादी हया उमरी येथील रहिवाशी नाहीत व प्रतिवादी हा देखील कानडी माळी येथील रहिवाशी नाही. प्रतिवादी क.१ हे विनाकारण दिलेल्या त्रासाबद्ल वादींकडून भरपाई मिळण्याचे हक्कदार झालेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यास वादीकडून रू.२०,०००/– भरपाई मिळणे योग्य व न्यायाचे आहे.

९. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री व्ही. डी. चिंचोलकर यांनी मुळ अर्जातील कथनाचा पुर्णउच्चार युक्तीवादमध्ये केला तर प्रतिवादी तर्फे विदवान विधीज्ञ श्री एन. पी. यादव यांनी दाखल केलेल्या जवाबातील कथनाचा पुर्नउच्चार युक्तीवादामध्ये केला आहे.

१०. सदर अर्जाचे निकालाकरीता पुढील मुद्दे माझे विचाराकरीता उपस्थित होता व त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीच्या कथनामध्ये तथ्य असल्याचे वादी सकृतदर्शनी सिध्द करतो काय? | नकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतो काय? | नकारार्थी |
| ३ | अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | नकारार्थी |
| ४ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **<u>का र ण मि मां सा</u>**

**११.** वादीने या अर्जाचे सिध्दतेसाठी निशाणी क्र ४ वर प्रतिवादी नं. १ चे नावे ८–अ उतारा, मौजे उमरी येथील सर्वे नं. ५५/१० ची ७/१२ नक्कल, फेरफार नं. ६१७ ची नक्कल, फेरफार क्र. १०४३ ची नक्कल, वादी यांचा शाळा सोडलयाचा दाखला व प्रवेश निर्गम उता–याची छायांकित प्रत इ. कागदपत्रे दाखल केलेले आहे.

**१२.** प्रतिवादीतर्फे फेरफार क्र. ३१४ आणी वादग्रस्त मिळकतीचा ७/१२ उतारा हि कागदपत्रे दाखल केली आहेत.

**मुददे क्र. १ ते ४ करीताः–**

**१३.** सदर मुददे एकमेकांसी निगडीत असल्याने पुनरावत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चीले आहेत. तात्पुरता मनाईच्या अर्जावर निर्णय देताना प्रथमदर्शी बाजू अनुकूलतेचा कल व अपरीमित नुकसान होणार काय ऐवढेच पहाणे गरजेचे असते. तसेच तात्पुरता आदेशाचा फायदा मिळवण्यासाठी संबंधित पक्षकाराने त्याच्या मागणीमध्ये कायद्याचे समन्याय तत्व दाखवुन देणे गरजेचे असते. प्रस्तुतचा दावा वादीनी वाटणी करुन वेगळा ताबा मिळणे बाबत दाखल केलेला आहे. त्यामुळे वादी हे वादग्रस्त मिळकत हि वादी व प्रतिवादींची वडीलोपार्जित व एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याबाबतची बाब प्रथमदर्शी दाखवणे आवश्यक आहे.

**१४.** वादीच्या कथनानुसार वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी व वादी यांची वडीलोपार्जित व एकत्र कुटूंबाची मिळकत आहे व ती प्रतिवादी त्रयस्थ इसमास विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. वादी हया वादग्रस्त मिळकतीमध्ये सहदायक असल्याकारणाने वादीचा वादग्रस्त मिळकतीमध्ये हिस्सा आहे. प्रतिवादी यांच्या युक्तीवादानुसार वादी यांचा वादग्रस्त मिळकतीशी काहीही हक्क संबंध नाही. वादी यांनी संपुर्ण वादग्रस्त मिळकत दाव्यात समाविष्ट केली नसून आवश्यक पक्षकार देखील दाव्यात समाविष्ट कले नाहीत. प्रतिवादी क्र. २ हाच वादीचा एकमेव वारस आहे.

**१५.** वादी यांनी वाटणी करुन वेगळा ताबा मिळण्याचा दावा दाखल केला आहे.

प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादी यांचा प्रतिवादींशी कोणताच हक्कसंबधं नाही कारण त्या प्रतिवादी क्र. १ च्या वारस नाही. सदरची बाब खोडण्याकरीता वादींनी न्यायालयीन अभिलेखावर वादी हिच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची व निर्गम उता–याची प्रत दाखल केली आहे. सदर प्रतीचे अवलोकन केले असता, वादी यांच्या नावासमोर प्रतिवादीचे नांव दिसून येत आहे. सदर कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी प्रतिवादी यांच्या कथनास पुष्टी मिळत नाही. त्यामुळे वादी यांचा वादग्रस्त मिळकतीशी हक्क संबंध नाही, हि बाब या ठिकाणी गृहित धरणे न्याय व योग्य नाही.

**१६.** तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचा विचार करता, वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. वादी हिच्या कथनाप्रमाणे वादग्रस्त मिळकत हि प्रतिवादी व वादी यांची वडीलोपार्जित व हिंदू एकत्र कुटूंबाची मिळकत आहे, वादग्रस्त जमीन हि वडीलोपार्जित मिळकत दाखवण्याकरीता वादींनी न्यायालयीन अभिलेखावर वादग्रस्त मिळकतीचा ७/१२ उता–याची प्रत दाखल केली आहे. दाखल ७/१२ उता–यावरून वादग्रस्त मिळकत हि बन्सी पंढरी म्हणजे प्रतिवादी क्र. १ चे नावे असल्याची दिसुन येत आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ यांनी दाखल कलेल्या वारस फेरफार क्र. ३१४ चे अवलोकन केले असता, मयत पंढरी यांना प्रतिवादी बन्सी समवेत अन्य तीन मुली वारस असल्याचे दिसून येत आहे. याशिवाय वादग्रस्त मिळकतीची साल १९९२–१९९३ ची ७/१२ ची प्रतीमध्ये पंढरी भागूजी यांचे नावाला आळा असून इतर अधिकाराचे वारस मुली असराबाई, अनुसयाबाई, केशरबाई यांचे नाव दिसून येत आहे. वडीलोपार्जित मिळकतीमध्ये मुलाप्रमाणे मुलींना सुध्दा समान अधिकार असतो, त्यामुळे प्रतिवादी बन्सी यांच्या सोबत त्यांच्या बहिणी सुध्दा दाव्यामध्ये आवश्यक अशा पक्षकार आहेत, कारण वादीच्याच कथनाप्रमाणे वादग्रस्त मिळकत हि वादी व प्रतिवादी क्र. १ ची वडीलोपार्जित मिळकत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांच्या बहिणींच्या गैरहजेरीत तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश केवळ प्रतिवादी क्र. १ च्या विरोधात मंजूर करणे न्यायाभिप्रत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे वादी स्वत: त्याच्या अर्जामध्ये कथन करते की, वादग्रस्त मिळकती समवेत मौजे उमरी शिवारात जमीन व ग्राम पंचायत हद्दीमध्ये जुने पडके घर आहे. परंतू वादी यांनी सदरची जमीन व पडके घर हे दाव्यामध्ये वादग्रस्त मिळकत म्हणून समाविष्ट केले नाही, जे की न्याय्य व जरुरीचे होते. यावरुन वादी हि न्यायालयासमोर

स्वच्छ हाताने आली आहे असे म्हणता येणार नाही, जे की तात्पुरत्या मनाई हुकूम मिळवण्यासाठी आवश्यक अशी बाब आहे.

**१७.** वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी हा वादग्रस्त मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करण्याचा तयारी आहे, परंतू सदर त्रयस्थ इसमाचे नांव, गांव नमूद न करता सदरील बाब वादी मोघम स्वरुपाचे कथन करत आहे. त्यामुळ वरील चर्चीलेप्रमाणे मी या निष्कर्षास आलो आहे की, प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुस नसून न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूस नाही. जर तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर केला तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी दर्शवून मुद्दा क्र. ४ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात सामाविष्ट करावा.

सही/– xxx

दि. २८.०२.२०२५

(**के. एन. निवडंगे**)
४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
केज